# जनसुनावणीचे इतिवृत्त

प्रकल्प प्रर्वतक मे. चिंताहरणी चिंतपूरनी रिअल्टर्स एलएलपी. क/ऑफ सरकार ग्रुप, बी/१७/१८, ग्राऊंड फ्लॉवर, भगनारी कॉ-ऑप हौसिंग सोसायटी, चुनाभट्टी, डेक्कन अँड कोसवय रोड, मुंबई-४०० ०२२, यांचा प्रकल्प "वरळी आदर्श नगरे सागर दर्शन ऐस.आर.ए. सी.एच.एस मार्यादित", सी.एस.नं. ५ (पार्ट) आणि १५ (पार्ट), वरळी डिव्हीजन, आदर्श नगर जनता कॉलनी, व्ही.बी. वरलीकर मार्ग, जी/उत्तर वॉर्ड, वरळी, मुंबई- ४०० ०३०, येथे प्रस्तावित पुनर्बांधकामाबाबतची पर्यावरणविषयक जनसुनावणी दिनांक २१.०९.२०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर, ओल्ड कस्टम हाऊस, शाहिद भगतसिंग मार्ग, मुंबई – ४०० ००१ याठिकाणी आयोजित करण्यात आली होती. सदर जनसुनावणीसाठी खालील शासकीय अधिकारी उपस्थित होते.

१) श्री. सदानंद जाधव - अध्यक्ष
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी,
मुंबई शहर

२) श्री. ज. शं. हजारे - सदस्य्
प्रादेशिक अधिकारी, मुंबई
म.प्र.नि. मंडळ, मुंबई.

3) श्री. तानाजी यादव - संयोजक
उप प्रादेशिक अधिकारी, मुंबई -१
म.प्र.नि. मंडळ, मुंबई.

जनसुनावणीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे -

सर्वप्रथम श्री. तानाजी यादव, जनसुनावणीचे आयोजक यांनी सर्वांचे स्वागत करुन मा. अध्यक्षांच्या परवानगीने जनसुनावणीस सुरुवात केली. त्यांनी आजची जनसुनावणी ही भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, दिल्ली यांच्या अधिनियम २००६ व सुधारीत २००९ तसेच जनसुनावणी सागरी तटीय विनियमन अधिनियम २०११ चे कलम क्र. 8 (V) (C) (d)- 4 शुध्दीपत्रक ६ जानेवारी २०११ मधील तरतुदी नुसार घेण्यात येत आहे असे सांगितले. सदर प्रकल्प धारकाने मे. वरळी आदर्श नगर सागर दर्शन ऐस.आर.ए. सी.एच.एस मार्यादित", सी.एस.नं. ५ (पार्ट) आणि १५ (पार्ट), वरळी डिव्हीजन, आदर्श नगर जनता कॉलनी, व्ही.बी. वरलीकर मार्ग, जी/उत्तर वॉर्ड, वरळी, मुंबई- ४०० ०३० म.प्र.नि. मंडळाकडे पर्यावरण विषयक जाहींर सुनावणीसाठीचा प्रस्ताव दि. २०/०४/२०२१ रोजी सादर केला. तद्नंतर मा. जिल्हाधिकारी यांनी मंगळवारी, दिनांक २१.०९.२०२१ रोजी, सकाळी ११.३० वाजता पर्यावरण विषयक जनसुनावणी घेण्याचे निश्चित केले. सदर जाहीर जनसुनावणीची जाहिरात एक महिना अगोदर "दैनिक नवशक्ती" या वर्तमानपत्रात मराठी भाषेमध्ये तसेच दैनिक "फ्री प्रेस जर्नल" या वर्तमानपत्रात इंग्रजी भाषेमध्ये दिनांक १८.०८.२०२१ रोजी प्रसिध्दी करण्यात आली. त्याअनुषंगाने आजची पर्यावरण विषयक जनसुनावणी आयोजीत करण्यात आलेली आहे. सदर प्रस्तावीत प्रकल्पाच्या प्रवर्तकांनी तयार केलेल्या पर्यावरण विषयक अहवालाच्या प्रती –

१) जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर, ओल्ड कस्टम हाऊस, शाहिद भगतसिंग मार्ग, मुंबई – ४०० ००१.

२) मा. प्रधान सचिव ,पर्यावरण विभाग मंत्रालय, नवीन प्रशासकिय इमारत, मुंबई.

३) प्रादेशिक अधिकारी (मुख्यालय), मप्रनि मंडळ, सायन, मुंबई.

४) सहाय्यक जी/दक्षिण वार्ड, एनएम जोशी मार्ग, एल्फिन्स्टन, दानमिल नाका, मुंबई -४०००१३,

५) प्रादेशिक अधिकारी/उपप्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, मुंबई.

या ठिकाणी रहिवासी यांना अभ्यासासाठी ठेवण्यात आलेल्या होत्या. या जनसुनावणीचा उद्देश सार्वजनिक सुनावणी आयोजीत करून बाधित रहिवासी यांचे मत, टिका- टिप्पणी, आक्षेप, वा पर्यावरणाच्या दृष्टीकोनातुन नोंदवून घेने हा आहे असे सांगितले. ही समिती प्रकल्पाबाबत कोणताही निर्णय घेत नाही. रहिवासी यांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी माहिती देणे, प्रकल्पामुळे पर्यावरणावर काय परिणाम होईल व त्यावर करावयाच्या उपाययोजना यांची माहिती देणे हा आहे असे सांगितले. श्री. तानाजी यादव, यांनी सांगितले की, प्रथम प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण विषयक सल्लागार यांनी प्रकल्पाविषयीची माहिती सादर करतील व त्यानंतर रहिवासी यांनी त्यांचे सदर प्रस्तावित प्रकल्पाबाबत आक्षेप, तक्रारी, सुचना मांडाव्यात व त्याची नोंद इतिवृत्तात घेउन ते पुढे महाराष्ट्र सागर तटीय व्यवस्थापन प्राधिकरण, मंत्रालय, मुंबई यांना पाठविले जातील. तसेच या समितीचे काम जनसुनावणी घेणे. रहिवाशांच्या टिका, टिप्पणी यांची नोंद घेवून त्याचा अहवाल शासनाला सादर करणे हे आहे असे सांगितले व प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाविषी माहिती देण्याची सूचना केली.

यानंतर श्री. अभिषेक पोरेडीवार, प्रकल्पाचे पर्यावरण विषयक सल्लागार यांनी सदर प्रकल्पाबाबत विस्तृतपणे स्लाईड शो द्वारे सादरीकरण केले, सदर सादरीकरणामध्ये त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाबाबतची माहिती, ठिकाण इ. दाखविली. त्यांनी सदर प्रस्तावित प्रकल्पाबाबतच्या इमारतीचा नकाशा, वाहन स्थळ सी. आर. झेड . नोटीफिकेशन २०११ मधील कलम ४ बाबत रहिवाशी क्षेत्र इत्यादींची माहिती सादर केली. सदर प्रस्तावित प्रकल्प हा निवासी पुन:निर्माण प्रकल्प आहे. सदर प्रस्तावित प्रकल्पाचे एकूण क्षेत्रफळ हे २५६३.४० चौ.मी. इतके असेल व प्रस्तावित बांधकामाचे एकूण क्षेत्रफळ ६१६२.४२ चौ.मी. इतके असेल. सदर प्रकल्पामध्ये रहिवाशी इमारत ०१, तळ मजला + १ ते ४५ वरील मजले (२ विंग) ही रहिवास इमारत असेल. बांधकामाच्या दरम्यान अंदाजे ३.२५ घ.मी. प्रती दिन इतका पाण्याचा वापर होईल. प्रकल्प पुर्ण होउन रहिवासी राहण्यास आल्यानंतर पाण्याचा वापर हा १२०.३७ घ.मी. प्रती दिन इतका असेल. सदर प्रकल्पातुन निघणारे घरगुती सांडपाणी ११४.३८ घ.मी. प्रति दिन इतके असून ते बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मलनिसारण वाहिनीत पुढील विल्हेवाटीसाठी सोडले जाईल. घनकचरा निर्मितीचे प्रमाण प्रति दिन १०० किलो/ दिन इतके असेल (बायोडिग्रेडेबल घनकचरा ५० किलो / दिन आणि नॉन-बायोडिग्रेडेबल कचरा ५० किलो / दिन). सदर प्रकल्पामधून निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याचे वर्गीकरण सुका व ओला असे करण्यात येईल व ओल्या कचऱ्याचे गांडूळखत बनविण्यात येईल व ते बाग बगिच्यासाठी वापरण्यात येईल. तर सुका कचरा हा पुनर्वापरासाठी पाठविण्यात येईल अथवा विकला जाईल. सदर प्रकल्प उभारत असताना आवाजाची तिव्रता कमी करण्याच्या दृष्टीने योग्य ती उपाययोजना करण्यात येईल. तसेच अग्नीशमन यंत्रणा, उर्जेचा वापर व बचत विषयी माहिती दिली. सादरीकरणाच्या शेवटी तांत्रिक सल्लागाराने प्रकल्पाधारकाकडून राबविण्यात येणार असलेल्या पर्यावरण विषयक उपाययोजनांची माहिती देवून सादरीकरण समाप्त केले.

तदनंतर मा. अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष यांनी उपस्थित रहिवासी यांना प्रकल्प प्रवर्तकाने पर्यावरण विषयक केलेल्या सादरीकरणाच्या अनुषंगाने काही शंका, टिका टिप्पणी अथवा उपाययोजना बद्दलची माहिती द्यावयाची असल्यास आपण ती या ठिकाणी तोंडी अथवा लेखी स्वरूपात सादर करणे बाबत सुचविले तसेच सदरची माहिती ही फक्त पर्यावरण विषयासंबंधीत असणे आवश्यक आहे. सदर प्रश्नांच्या अनुषंगाने प्रकल्प प्रवर्तक त्यावर करण्यात येणाऱ्या उपाययोजनांच्या अनुषंगाने थोडक्यात माहिती देतील असे नमूद केले. सोबत सादरीकरण अहवालाची प्रत जोडली आहे.

**सदर जनसुनावणी दरम्यान प्रकल्प प्रवर्तकांना खालील प्रमाणे माहिती विचारण्यात आली.**

**प्रश्नोत्तरे**

**श्री. उप प्रादेशिक अधिकारी, मुंबई- १.**

**प्रश्न :-** जुनी इमारत पाडताना निर्माण होणा-या डेब्रीजची विल्हेवाट कशी लावली जाईल ?

उत्तर:- इमारत पाडताना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संबधित विभागात प्लॅन बाबत सुचना केली जाईल व त्यानंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये योग्य ती रक्कम भरुन डेब्रीज त्या साईटवर डंप केली जाईल.

**श्री. उप प्रादेशिक अधिकारी, मुंबई- १.**

**प्रश्न** :- नवीन प्रकल्पाम्ध्ये वृक्ष लागवड कशी केली जाणार आहे ?

**उत्तर**:- सद्यस्थितीत सदर प्रकल्पामध्ये काही वृक्ष असून त्यांचे बांधकामादरम्यान योग्य प्रकारे जतन केले जाईल तसेच DCR नुसार व वृक्षप्राधिकरण / उद्यान विभाग यांच्या सुचनेनुसार वृक्ष लागवड केली जाईल.

**मा. अध्यक्ष.**

**प्रश्न** :- सदर झोपडपट्टी पुनवर्सन प्रकल्पामध्ये किती रहिवाशी सदनिका राहणार आहेत ?

**उत्तर**:- सदर प्रकल्पामध्ये १२० कुटूंबे असून त्यापैकी २१ गाळे आहेत.

**मा. अध्यक्ष.**

**प्रश्न** :- या प्रकल्पामध्ये विक्रीसाठी असणारे घटक किती आहेत ?

**उत्तर**:- या प्रकल्पामध्ये एकूण २४६ सदनिका असून त्यापैकी १०० सदनिका विक्रीसाठी असतील.

**मा. अध्यक्ष.**

**प्रश्न** :- या प्रकल्पातील सदनिकामधील सर्व कुटूंबे राहण्यासाठी आल्यानंतर जनसंख्या घनत्व कसे असेल ?

**उत्तर**:- या प्रकल्पामध्ये साधारणपणे ९०० लोक राहणार असून त्यामध्ये सुरक्षारक्षक इमारत देखभाल करणारे व इतर घरगुती कामानिमित्त येणा-या लोकांचा समावेश असेल.

**मा. अध्यक्ष.**

**प्रश्न** :झोपडपट्टी पुनवर्सन प्रकल्पामध्ये सदनिकांचे क्षेत्रफळबाबत सदर प्राधिकरणाचे नियम कशा प्रकारे आहेत ?

**उत्तर**:- सदनिकाचे क्षेत्रफळ हे DCR मधील तरतूदी प्रमाणे असेल तथापि या प्रकल्पाचा आराखडा अजून फाईनल झालेले नाही.

**प्रादेशिक अधिकारी, मुंबई**

**प्रश्न** : या प्रकल्पामध्ये पुनर्वसन सदनिका व विक्रीसाठी असणा-या सदनिका यांचे प्रमाण काय असणार आहे ?

**उत्तर**:- डी.सी. नियम व सध्याच्या चटईक्षेत्रानुसार या प्रकल्पामध्ये १२० पुनर्वसित सदनिका व २१ गाळे/ दुकाने तसेच विक्रीसाठी असणा-या एकूण सदनिका एकूण ९५ व ५ – इतर सुविधा व एक दुकान गाळे असतील.

**मा. अध्यक्ष.**

**प्रश्न** : सदर प्रकल्पामध्ये प्रदुषण करणारे गाळे आहेत का ?

**उत्तर**:- या प्रकल्पामध्ये कुठल्याही प्रकारचे प्रदूषण करणारे गाळे नसून या प्रकल्पात फक्त शिवणकाम तसेच किराण माल यासारखी दुकाने असतील असे या प्रकल्पातील सदस्याने सांगितले.

**मा. अध्यक्ष.**

**प्रश्न** :या प्रकल्पामध्ये किती कार पार्किंग असतील ?

**उत्तर**:- एकुण १४७ कार पार्किंग असतील .

**मा. अध्यक्ष.**

**प्रश्न** :या प्रकल्पातील पुर्नविकास सदनिकांसाठी किती कार पार्किंग असतील ?

**उत्तर**:- या प्रकल्पामध्ये सात सदनिकांच्या मागे एक पार्किंग असेल.

**मा. अध्यक्ष.**

**प्रश्न :**या प्रकल्पामध्ये मोटारसायकलच्या पार्किंगसाठी कशी व्यवस्था करण्यात आली आहे ?

**उत्तर:-** पोडियम / स्टॅक पार्किंग असल्यामुळे सदनिकांच्या चटईक्षेत्रानुसार कार पार्किंग दिले जाईल तसेच तळमजल्यावर मोटरसायकल पार्किंग व्यवस्था असेल.

**मा. अध्यक्ष.**

**प्रश्न :** पुर्नविकास सदनिका व विक्रीसाठी असणा-या सदनिका या दोघांनाही पार्किंग देणे शक्य होईल का ?

**उत्तर:-** पुर्नविकास सदनिकांना डी.सी. नियमाप्रमाणे पार्किंग दिले जाईल त्यानुसार त्यांना ३० कार पार्किंग व विक्रीसाठी असणा-या सदनिकाना ११७ कार पार्किंग प्रस्तावित आहेत.

**उप प्रादेशिक अधिकारी, मुंबई- १.**

**प्रश्न :-** घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी कशा प्रकारची सयंत्रणा असेल ?

**उत्तर:-** सदर सयंत्रणा कशी असेल याबाबतची योजना अजून फाईनल झालेली नाही.

**उप प्रादेशिक अधिकारी, मुंबई- १.**

**प्रश्न :-** सदर प्रकल्पामधून किती सांडपाणी निर्माण होणार आहे ?

**उत्तर:-** सदर प्रकल्पामधून ११४.३८ घनमीटर / दिन इतके सांडपाणी निर्माण होणार आहे.

**प्रादेशिक अधिकारी, मुंबई.**

**प्रश्न :-** पुर्नविकास सदनिका व विक्रीसाठीच्या सदनिका यांच्या घरगुती सांडपाणी सयंत्रणा वेगवेगळया असणार आहेत का ?

**उत्तर:-** दोन्ही प्रकारच्या सदनिकासाठी सामाईक घरगुती सांडपाणी सयंत्रणा प्रस्तावित आहे.

**प्रादेशिक अधिकारी, मुंबई.**

**प्रश्न :-** प्रक्रियाकृत सांडपाण्याची विल्हेवाट कशी केली जाणार आहे ?

**उत्तर:-** प्रक्रियाकृत सांडपाणी कार धुणे व गार्डनसाठी वापरले जाणार आहे.

**प्रादेशिक अधिकारी, मुंबई.**

**प्रश्न :-** घनकचरा विल्हेवाटीसाठी कशा प्रकारे व्यवस्था करण्यात आली आहे ?

**उत्तर:-** अजैविक प्रकारचा घनकचरा पुर्नप्रक्रियेसाठी देण्यात येईल व जैविक कच-यापासून पासून गांडूळ खत बनविण्याचा प्रस्ताव आहे.

**मा. अध्यक्ष.**

**प्रश्न :** गांडूळखत बनविण्याचा प्रकल्प कशा प्रकारे आहे ? व किती गांडूळ खत निर्माण होईल ?

**उत्तर:-** ओल्या कच-यासाठी एका विशिष्ट प्रकारचे साठवणूक केली जाईल. या प्रक्रियेतून साधारणपणे ५० किलो / दिन इतके गांडूळ खत निर्माण होईल.

**मा. अध्यक्ष.**

**प्रश्न :** एकूण सदनिकांचा विचार केल्यास ओला कचरा व सुका कचरा यांची निर्मिती किती असल्याचे दिसून येते ?

**उत्तर:-** अंतिम प्रयोजना मंजूरी मिळून EIA साठी अर्ज सादर करण्यापूर्वी योग्य प्रकारे सर्व्हे करून ओला व सुखा कचरा निर्माती किती होईल त्यानुसार गांडूळ खताच्या प्रकल्प बनविला जाईल.

**मा. अध्यक्ष.**

**प्रश्न :**या प्रकल्पामध्ये सादर करण्यात आलेली माहिती अपूर्ण आहे असे दिसून येते ?

**उत्तर:-** प्लॅनिंग स्टेजला व्यापक प्रमाणावर प्रकल्पाची सर्व माहिती घेवून त्याचा पर्यावरणीय आघात व त्यावरील उपाय या संदर्भात पर्यावरण व्यवस्थापन योजना बनवून प्रस्ताव पर्यावरण आघात मुल्यांकन कमिटेकडे

**उप प्रादेशिक अधिकारी, मुंबई- १.**

**प्रश्न :-** या प्रकल्पामध्ये ऑरगॅनिक वेस्ट कन्व्हेटर आहे का?

**उत्तर:-** हो आहे.

**उप प्रादेशिक अधिकारी, मुंबई- १.**

**प्रश्न :-** सदर प्रकल्पामध्ये वाहनाचे प्रमाण जास्त असल्यामुळे प्रदूषण होवू शकते त्यावर काय उपाययोजना प्रस्तावित आहेत ?

**उत्तर:-** पार्किंग एरियामध्ये कार्बन मोनोक्साईड शोधक, फायर अलार्म तसेच चांगली वायू वीजन व्यवस्था प्रस्थावित आहे.

शेवटी जन सुनावणी समितीचे मा. अध्यक्ष यांनी उपस्थितांनी जे म्हणणे आज मांडलेले आहे त्याची नोंद घेण्यात आलेली आहे, आजच्या जनसुनावणीचे इतिवृत्त, सी.डी. व आपण विचारलेल्या प्रश्न याचा समावेश करून पुढे महाराष्ट्र सागर तटीय व्यवस्थापन प्राधिकरण, मंत्रालय, मुंबई यांना पाठविले जाईल असे सांगितले.

तदनंतर सदर प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणीसाठी सर्वांनी उपस्थित राहून आपली मते मांडून जनसुनावणी शांततेने पार पाडल्याबद्दल उपस्थितांचे आभार मानले तसेच प्रकल्पातील रहिवाशी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांचे या प्रकल्पाविषयी पर्यावरण विषयी प्रश्न नसतील असे सांगितले व त्यांनी जनसुनावणी यशस्वी संपन्न् झाल्याचे जाहीर केले.

| | | |
|---|---|---|
| (तानाजी यादव)<br>उप प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, मुंबई -१,<br>तथा संयोजक/सदस्य<br>जनसुनावणी समिती | (ज. शं. हजारे)<br>प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, मुंबई<br>तथा सदस्य्<br>जनसुनावणी समिती | (सदानंद जाधव)<br>अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी,<br>मुंबई शहर तथा<br>अध्यक्ष<br>जनसुनावणी समिती |